**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)**
मु.पो.शिर्डी, ता.राहाता, जि.अहमदनगरपिन.४२३१०९
फोन नं. (०२४२३) २५८५००/२५८७७१/२५८७७२ फॅक्स नं.२५८८७०
(Websitewww.sai.org.in , E-mail – purchase@sai.org.in)

## जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागासाठी सन २०२४-२५ वर्षाकरीता भाजीपाला खरेदीकामी ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदेचे निकष, अटी-शर्ती व माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in /tenderयासंकेतस्थळाला भेट द्यावी.

२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोडींग व अपलोडींगसाठी दि. १०/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून ते दि. २४/०२/२०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

(तुकाराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी

# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

शिरडी ४२३ १०९.
तालुका-राहाता, जिल्हा-अहमदनगर

दुरध्वनी क्रमांक (०-२४२३) २५८५००, खरेदी विभाग- २५८७७१, २५८७७२,
फॅक्स क्रमांक -०२४२३-२५८८७०
Website – www.sai.org.in E-mail 1.saibaba@sai.org.in2.purchase@sai.org.in

मुंबई कार्यालय-साईनिकेतन, ८०४ बी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर
मुंबई-४०० ०१४ दूरध्वनी क्रमांक (०२२) २४१६६५५६, २४१६१२९३

## सन २०२४-२५

## श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागासाठी चार टप्प्यामध्ये भाजीपालाखरेदीबाबत ई-निविदा

१. एप्रिल -२०२४ ते जुन-२०२४ – तीन महिने
२. जुलै -२०२४ ते सप्टेंबर-२०२४ – तीन महिने
३. ऑक्टोंबर -२०२४ ते डिसेंबर-२०२४ – तीन महिने
४. जानेवारी -२०२५ ते मार्च-२०२५ – तीन महिने

**A. निविदेचा तपशिल- श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागासाठीभाजीपालापुरविणेबाबत ई-निविदा**

**B. ई-निविदेसोबत सादर करावयाची कागदपत्रे, वगैरेतपशील खालीलप्रमाणे-**

१. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना/ATMA (Agricultural Technology Management Agency) किंवा महाराष्ट्र राज्य कृषी विभाग पणन महामंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र/तत्सम शासकीय परवाना ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील.

२. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने पॅन कार्ड ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहिल.

३. ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे त्या नावाने GST Number Certificate / Online GST Number Registration Receipt (आवश्यकतेनुसार)ऑनलाईन सादर करावे.

**C. पुरवठा करावयाच्या भाजीपाल्याचा तपशिल, निविदा फी व बयाणा रक्कम-**

१. एप्रिल-२०२४ ते जुन-२०२४, जुलै-२०२४ ते सप्टेंबर-२०२४, ऑक्टोबर-२०२४ ते डिसेंबर-२०२४, जानेवारी-२०२५ ते मार्च-२०२५ अशा प्रत्येक तीन महिन्याचे कालावधीत भाजीपाला पुरविणेसाठी BOQ चे चार भाग करण्यात आले आहेत. निविदाधारकास सदर निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी Online चार BOQ मध्ये दर भरावे लागतील. निविदाधारक कुठल्याही भागासाठी/भागांसाठी निविदा सादर करु शकतो. तथापि निविदा फी व बयाणा रक्कम ठरविलेप्रमाणेच राहिल.

२. निविदा फी रक्कम रु.२६,६२०/- व बयाणा रक्कम रु. २,६६,२००/- मात्र www.mahatenders.gov.inया वेबसाईटवर ऑनलाईन भरावी.

३. **<u>MSME अंतर्गत निविदा फी व बयाणा रक्कम न भरण्याची सवलत या निविदेला लागू नाही. सर्व निविदाधारकांनी निविदा फी व बयाणा रक्कम भरणे अनिवार्य आहे.</u>**

४. प्रत्येक तिमाही कालावधीसाठी भरलेल्या आयटेम वाईज भाजीपाला दरांचा तुलनात्मकदृष्टया स्वतंत्रपणे विचार करण्यात येईल.

**D. ऑनलाईन निविदा कालावधी व तांत्रिक- कमर्शिअल बीड बाबतची माहिती-**

१. सदर निविदा दि.१७ / ०२ /२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पासून दि. २४ / ०२ /२०२४ सायं. ०५.०० वाजेपर्यंत www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Downloading व Uploading साठी उपलब्ध राहील.

२. ई-निविदेसोबत फक्त Online मागणी केलेली कागदपत्रे सादर करावयाची आहेत. Hard Copy मध्ये कागदपत्रे सादर करु नयेत. Hard Copy मध्ये सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार केला जाणार नाही.

३. शक्य झाल्यास दि.२६/०२/२०२४ रोजी Online Technical Bid उघडण्यात येईल. निविदेसोबत Online सादर केलेली कागदपत्रे मागणीप्रमाणे असल्यासच Commercial Bid उघडणेत येईल अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही.

४. Commercial Bid उघडणेचे दिवशी आपण किंवा आपले प्रतिनिधींनी शक्य झाल्यास उपस्थित राहावे. ऑनलाईन निविदा सादर करताना निविदाधारकांनी आपले फोन नंबर्स ऑनलाईन निविदेमध्ये सादर करावेत म्हणजे पात्र ठरणा-या निविदाधारकांना Commercial Bid उघडणेची तारीख व वेळ कळविता येईल.

**E. निविदेत ऑनलाईन दर भरतांना सर्व कर व खर्चासह दर नमूद करणे-**

१. निविदेत दिलेले वर्णन, दर्जा, कालावधी, निविदा अटी-शर्ती, Quantity, Schedule, सर्व टॅक्सेससह शिर्डीचे प्रसादालय विभाग येथे भाजीपाला पोहोच करणे, हमाली, वाराई, वाहतूक खर्च, मार्केट सेस, मापाई वगैरे सर्व बाबींचा निविदाधारकाने काळजीपुर्वक अभ्यास करून दर भरावेत.

२. ऑनलाईन कमर्शियल निविदा दर भरताना काळजीपुर्वक भरावेत. याबाबत दर कमी नमुद केले आहेत किंवा दराबाबतची कुठलीही विनंती कुठल्याही परिस्थितीत ग्राह्य धरली जाणार नाही.

**F. ऑनलाईन निविदा उघडण्याची कार्यपध्दती-**

१. निविदेचा Download कालावधी संपल्यानंतर खरेदी समितीचे सभेत ऑनलाईन तांत्रिक ई-निविदा प्रथम उघडण्यात येतील. त्यानंतर तांत्रिक निविदेमध्ये पात्र ठरलेल्या निविदाधारकांच्या कमर्शिअल निविदा उघडण्यात येतील.

२. कमर्शिअल निविदा उघडलेनंतर न्युनतम दर असलेले निविदाधारकांशी चर्चा-वाटाघाटी होऊ शकतील, चर्चा-वाटाघाटी नंतरचे दरास अंतिम मान्यता मिळालेनंतर पुरवठा आदेश देण्यात येईल. तसेच निविदाधारकास सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा पुर्तता करावी लागेल.

**G- सुरक्षा अनामत रक्कम व करारनामा-**

१. शासनाच्या खरेदी नियमावलीप्रमाणे ज्यांच्या निविदा मंजूर होतील त्यांना विहीत मुदतीत भाजीपाल्याचा पुरवठा करावयाची हमी म्हणून मंजुर एकुण रक्कमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून श्री साईबाबा संस्थानकडे ठेवावी लागेल. निविदा मंजुर झाल्याचे कळविलेनंतर त्वरीत सदर रकमेचा भरणा करावा लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम व्यवस्थितरित्या सदर भाजीपाल्याचा पुरवठा केलेनंतर परत करता येईल. सुरक्षा अनामत अगर बयाणा रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

२. निविदा मंजुर झालेनंतर ३% सुरक्षा अनामत रक्कम त्वरित NEFT/RTGS/ रोखीने भरावी लागेल. तसेच शिर्डी येथे समक्ष येऊनरु.१००/- चे स्टॅम्प पेपरवर त्वरित करारनामा नोटरी करुन देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी निविदाधारकास आदा करावी लागेल.

**H. भाजीपाला पुरवठा करावयाचे ठिकाण व धोरण-**

१. निविदेत नमूद केलेल्या भाजीपाल्याचा पुरवठा शिर्डी येथील श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागामध्ये करावा लागेल.

**I. भाजीपाल्याचा पुरवठा करण्याची मुदत व पुरवठा करण्याची कार्यपध्दती-**

१. भाजीपाला पुरवठा करण्याचा कालावधी एप्रिल-२०२४ ते जुन-२०२४, जुलै-२०२४ ते सप्टेंबर-२०२४, ऑक्टोबर-२०२४ ते डिसेंबर-२०२४, जानेवारी-२०२५ ते मार्च-२०२५ असा राहिल.

२. निविदा मंजुर झालेनंतर चांगल्या दर्जाचा भाजीपाला पुरवावा लागेल. खराब भाजीपाला स्विकारला जाणार नाही. अशा भाजीपाल्याचा पुरवठा झाल्यास तो स्वखर्चाने तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास, त्याची नासधूस झाल्यास त्यास श्री साईबाबा संस्थान जबाबदार राहणार नाही.

३. प्रत्येक आठवडयात दोन वेळेस (गुरुवार व रविवार) अगर संस्थान प्रसादालयाचे धोरणानुसार गरजेप्रमाणे भाजीपाल्याची मागणी केली जाईल. श्री साईबाबा संस्थानचे प्रसादालय विभागाकडील गरजेनुसार भाजीपाला पुरवावा लागेल.

४. शिर्डी येथे श्रींचे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या गर्दीवर सदर प्रसाद भोजनाची सेवा अवलंबून असल्यामुळे भाजीपाला मागणी निविदेमध्ये अंदाजे नमुद करण्यात आलेली आहे. तथापी निविदा कालावधीत अगर त्यानंतरही पुढील खरेदी संबंधीत प्रक्रिया पुर्ण होईपावेतो आवश्यकतेनुसार मंजुर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा भाजीपाल्याची मागणी श्री साईबाबा संस्थानकडून झाल्यास त्या भाजीपाल्याचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमुद केलेला सर्व भाजीपाला घेणे श्री साईबाबा संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

५. प्रसादालयात पुरविणेत येणारा भाजीपाला स्वच्छ पोते व कॅरेटमध्ये,वाहतुकीमध्ये खराब होणार नाही अशी काळजी घेऊन त्या पद्धतीने पुरवावयाचा आहे. तसेच भाजीपाला धुताना स्वच्छ चांगल्या पाण्याचा वापर करावा.

६. श्री साईबाबासंस्थानचे प्रसादालयातील पर्यवेक्षक/आचारी पुरवठा आदेश दिलेले वर्णनाप्रमाणे भाजीपाल्याची तपासणी करतील व ताब्यात घेतील. भाजीपाला स्विकारणेबाबत अधिक्षक, प्रसादालय यांचा निर्णय अंतिम राहील.

७. प्रसादालय विभागाने कळविलेले Schedule प्रमाणे भाजीपाला पुरवावा लागेल. तसेच भाजीपाला पुरवठा Food & Adulteration Act व शासन Food Safety Regulations प्रमाणे पुरविणे बंधनकारक राहील. याबाबत काही प्रसंग उद्भवल्यास ही संपूर्ण जबाबदारी संबंधित पुरवठाधारकाची राहील.

८. भाजीपाला पुरविणेची मागणी प्रसादालय विभागाकडून तीन दिवस अगोदर देण्यात येईल व त्यामध्ये दिलेले Schedule प्रमाणे भाजीपाला पुरवठा करावा लागेल.

९. पुरविणेत येणारा भाजीपाला ताजा, स्वच्छ व चांगल्या दर्जाचा असावा. पुरवठा आदेशातील पुरवठा केलेला भाजीपाला कमी प्रतीचा आढळल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधीत पुरवठाधारकाची राहील. तसेच किड असलेला भाजीपाला स्विकारला जाणार नाही.

१०. भाजीपाला पुरवठा आदेशाची बदली पुरवठाधारकाने दुसरा भाजीपाला पुरविल्यास तो स्वीकारला जाणार नाही.

**J बील आदा करण्याची पध्दती-**

१. पुरविलेल्या भाजीपाल्याचे बिल त्याचा दर्जा व परिमाण योग्य असल्याची खात्री झाल्यावरच आदा करणेत येईल. सदर पुरवठ्यापोटी आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

२. भाजीपाल्याचे बील श्री साईबाबा संस्थानकडे सादर केलेपासून ३० दिवसांचे आत संबंधित पुरवठाधारकाला आदा करण्याचा प्रयत्न राहिल. मात्र तांत्रिक अडचणींमुळे बील अदायगीस विलंब झाल्यास पुरवठा (भाजीपाला) थांबविता येणार नाही.

३. पुरवठा आदेशातील वर्णनाप्रमाणे भाजीपाल्याचा पुरवठा करावा व त्याप्रमाणे बील सादर करावे.

४. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्याकर कपाती बिलातून करण्यात येतील.

**K. आपत्ती/ नैसर्गिक आपत्ती, नुकसान भरपाई व दंडात्मक कारवाईबाबतची तरतुद :-**

१. पुरवठा आदेशातील भाजीपाला मुदतीत पुरविला नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या भाजीपाल्याची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५ % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

२. भाजीपाला पुरविणेचा आदेश दुरध्वनीवरुन अथवा प्रसादालयाचे मागणी चलनात दिलेले Schedule प्रमाणे भाजीपाल्याचा पुरवठा न झाल्यास अगर योग्य प्रतीचा नसल्यामुळे तो नाकारला गेल्यास श्री साईबाबा संस्थानची अडचण होऊ नये म्हणून श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितका किंवा दिलेल्या आदेशा इतका भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समितीमधून अगर बाजारातून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या भाजीपाल्यासाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या भाजीपाल्याच्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थानला राहील.

३. निविदेतील मंजुर दराने भाजीपाला पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजुर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव भाववाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने भाजीपाला पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास श्री साईबाबा संस्थानला बाजारभावाने भाजीपाला खरेदी करावा लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल करण्याबाबत श्री साईबाबा संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील.

४. निविदा पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी पुरवठाधारकांच्यानियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक भाजीपाल्याचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल.तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजुर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

५. पुरवठाधारकाने पुरविलेला भाजीपाला श्री साईबाबा संस्थानने नाकारला व त्यामुळे बाजारभावाने कृषी उत्पन्न बाजार समितीमधून खरेदी करावे लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतुन अथवा श्री साईबाबा संस्थानकडून देय असलेल्या भाजीपाल्याच्या बिलातुन वसुल केली जाईल व ५ टक्के पर्यंत दंडाची रक्कम संबंधित पुरवठाधारकाकडून वसूल करण्यात येईल.

६. पुरवठाधारकाने भाजीपाला दर्जा, वर्णनाप्रमाणे व डिलेव्हरी शेडयूलप्रमाणे पुरविला नाही तर श्री साईबाबा संस्थान पर्यायी भाजीपाला उपलब्धतेसाठी सदर करार रद्द करील व याकामीचे अतिरिक्त खर्चाची वसुली संबंधित पुरवठाधारकाकडून करील व अटी/शर्तीचा भंग झाल्यामुळे उचित कारवाई संस्थानमार्फत करण्यात येईल.

## L निविदा वैधता कालावधी-

१. सदर ई-निविदेचा वैधता कालावधी निविदेच्या अंतिम तारखेपासून १२० दिवस राहील.

## M. सर्व साधारण अटी शर्ती/सुचना-

१. निविदेमध्ये नमूद केलेल्याप्रत्येक भाजीपाला आयटेम्सचे **Item wise** तुलनात्मकदृष्टयाप्राप्तन्युनतम दर विचारात घेऊन पुरवठा आदेश देण्यात येतील. त्याप्रमाणे पुरवठा करणे बंधनकारक राहील. याबाबत निविदाधारकाने निविदा भरतांना विचार करावा.

२. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माणझाल्यास तो राहाता/कोपरगाव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

३. निविदेत सहभागी निविदाकाराने निविदा प्रक्रियेमध्ये कोणत्याही टप्प्यावर निविदेतून माघार घेतल्यास त्यांची बयाणा रक्कम जप्त करण्यात येईल.

४. राज्याबाहेरील निविदाकाराची निविदा मंजुर झाल्यास शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील नियम क्र.३.१.२.८ नुसार राज्याबाहेरील पुरवठादार जर न्युनतम असला व महाराष्ट्र राज्यातील पुरवठादार व्दितीय न्युनतम असला तर महाराष्ट्र राज्यातील पुरवठादारांना प्रोत्साहन देण्यासाठी, महाराष्ट्र राज्यातील व्दितीय न्युनतम दरधारक जर न्युनतम दरधारकांच्या दरात भाजीपाला पुरविण्यास तयार असेल तर एकूण खरेदी करावयाच्या भाजीपाल्याच्या ५० टक्के भाजीपाल्याचा पुरवठा आदेश राज्यातील पुरवठादाराला देण्यात येईल व ते जर तयार नसतील तर पुर्ण भाजीपाल्याचा पुरवठा आदेश राज्याबाहेरील पुरवठादाराला देण्यात येईल.

५. कोणतीही निविदा अंशतः/पुर्णतः स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व निविदा नाकारणेचा हक्क संस्थानने राखून ठेवलेला आहे.

६. श्री साईबाबा संस्थानने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल अगर संस्थान जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठादाराची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

७. सशर्त निविदा तात्काळ रद्द करण्यात येतील. सदर निविदेतील नमूद अटी-शर्ती व अर्हता पुर्ण करू न शकलेल्या निविदाधारकांच्या निविदा रद्द करण्यात येतील.

८. निविदेसंबंधी काही माहिती पाहिजे असल्यास/ शंका असल्यास खरेदी विभाग दुरध्वनी क्रमांक ०२४२३-२५८७७१/७२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार संस्थानने राखून ठेवलेला आहे. निविदाधारकाची कोणतीही अट/अटी संस्थानवर बंधनकारक राहणार नाही, अशा निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत.

8.2.24

(तुकाराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी,
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी

# निविदाधारकाबाबत माहिती

१. फर्मचे नांव- ----------------------------------------------------------

२. पत्रव्यवहारासाठी संपुर्ण पत्ता- ----------------------------------------------------------

३. दूरध्वनी क्रमांक- ----------------------------------------------------------

ऑफीस- ----------------------------------------------------------

दुकान- ----------------------------------------------------------

निवास- ----------------------------------------------------------

मोबाईल नंबर- ----------------------------------------------------------

फॅक्स नंबर- ----------------------------------------------------------

ई –मेल ----------------------------------------------------------

४. संपर्कासाठी व्यक्तीचे नांव- ----------------------------------------------------------

दूरध्वनी/ मोबाईल क्रमांक- ------------------------------------------------------

५. मालकाचे/भागीदारांची नावे १. ----------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------

६. बॅंक खाते नांव १.----------------------------------------------------------

शाखा २. ----------------------------------------------------------

खाते नंबर व प्रकार ३.----------------------------------------------------------

आयएफएससी कोड ४.----------------------------------------------------------

दिनांक :- / /२०२४

ठिकाण :-

निविदाधारकाची सही व शिक्का

अ) **Technical Bid मधील कागदपत्रे (चेक लिस्ट)**

१. अद्ययावत दुकान नोंदणी दाखला/कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना/ ATMA/महाराष्ट्र राज्य कृषी विभाग पणन महामंडळ यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र/ तत्सम शासकीय परवाना

२. GST नोंदणी क्रमांक प्रमाणपत्र किंवा ऑनलाईन GST क्रमांक पावती (आवश्यकतेनुसार)

३. पॅन कार्ड

दिनांक - / /२०२४

ठिकाण -

**निविदाधारकाची सही व शिक्का**

प्रति,
**मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)
शिर्डी, ता.राहाता, जिल्हा-अहमदनगर.

**विषय– एप्रिल-२०२४ ते मार्च-२०२५ करिता श्री साई प्रसादालय विभागासाठी भाजीपाला पुरविण्याचे ई-निविदेबाबत...**

महोदय,

खालील सही करणार मी/आम्ही कळवितो की, वरील विषयाबाबत आपण प्रसिद्ध केलेली निविदा वाचली. आपल्या निविदेत दिलेल्या सर्व अटी व शर्ती मी/आम्ही वाचल्या असून मला /आम्हाला मान्य आहेत. आपले अटी/शर्तींचे पालन करावयाचे मी/आम्ही मान्य करीत आहे/आहोत.

मी/आम्ही आपणांस निविदेमध्ये नमुद केलेला भाजीपाला, आपल्या मागणीप्रमाणे उपरोक्त कालावधीकरिता, श्री साईबाबा संस्थानचे गरजेनुसार, आवश्यक त्यावेळी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांचे प्रसादालयात पोहोच करण्याची हमी देतो. सदर भाजीपाल्याचे परिमाण अंदाजे असल्यामुळे वेळ प्रसंगी नमुद केलेल्या परिमाणापेक्षा २५% पर्यंत जास्त भाजीपाल्याची संस्थानतर्फे मागणी झाल्यास मी/आम्ही तो मंजुर दराने पुरविण्याची हमी देत आहे/आहोत.

ज्या भाजीपाल्याच्या निविदा मंजुर होतील, त्या मान्य दराने भाजीपाल्याचा पुरवठा करण्याची हमी म्हणून, मंजुर भाजीपाल्याच्या एकुण रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून निविदा मंजुर झाल्याचे कळविल्यापासून १५ दिवसांचे आत मी/आम्ही रोख भरणा करु. बयाणा रक्कम सुरक्षा अनामत खाती वर्ग करण्यास माझी संमती आहे. तसेच रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटराईज्ड करुन देऊ व त्याप्रमाणे मंजूर दराने निविदा कालावधीत मागणीप्रमाणेभाजीपाला वेळेवर शिर्डी येथील प्रसादालय विभागात पोहोच करणे आमचेवर बंधनकारक राहील.

दिनांक - / /२०२४
ठिकाण -

आपला/आपले विश्वासू,

फर्मचे मालकाचे/भागीदाराचे नांव

सही/सहया व शिक्का

(१)-----------------------------------

(२) -----------------------------------

**सोबत-** कागदपत्रे

# एप्रिल - २०२४ ते जुन २०२४ करिता खरेदी करावयाचे भाजीपाला परिशिष्ट

| अ.नं. | मालाचे वर्णन | (मागणी किलो) | दर प्रती किलो | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | ६७५०० | | |
| २ | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | ४५००० | | |
| ३ | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | ६७५० | | |
| ४ | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | ७५०० | | |
| ५ | वांगी -चांगल्या प्रतिचे, गावरान | २०००० | | |
| ६ | टोमॅटो - चांगल्या प्रतिचे, मोठे | १२५०० | | |
| ७ | कोथंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १५०० | | |
| ८ | कोबी - चांगल्या प्रतिचा | ३०००० | | |
| ९ | भोपळा - चांगल्या प्रतिचा | ३२५०० | | |
| १० | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | २५००० | | |
| ११ | पालक - चांगल्या प्रतिचा | ४००० | | |
| १२ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| १३ | लिंबु -चांगल्या प्रतिचे | १०० | | |
| १४ | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | ६२५० | | |

| अ.नं. | मालाचे वर्णन | (मागणी किलो) | दर प्रती किलो | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|
| १५ | आद्रक -चांगल्या प्रतिचे, गावरान | ५०० | | |
| १६ | गाजर -चांगल्या प्रतिचे , गावरान | ७५ | | |
| १७ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | १५० | | |
| १८ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिच्या , गावरान | १२५ | | |
| १९ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | २० | | |
| २० | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | ५० | | |
| २१ | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | १०० | | |
| २२ | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | ० | | |
| २३ | बीट -चांगल्या प्रतिचे | ५ | | |
| २४ | फ्लावर -चांगल्या प्रतिची | १२०० | | |
| २५ | गवार शेंगा - गावरान | ० | | |
| २६ | दोडके - चांगल्या प्रतीचे | २५०० | | |
| २७ | हिरवा वाटाणा | १००० | | |

| जुलै - २०२४ ते सप्टेंबर २०२४ करिता खरेदी करावयाचे भाजीपाला परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचे वर्णन | (मागणी किलो) | दर प्रती किलो | एकुण रक्कम |
| १ | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | ६७५०० | | |
| २ | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | ४५००० | | |
| ३ | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | ६७५० | | |
| ४ | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | ७५०० | | |
| ५ | वांगी -चांगल्या प्रतिचे, गावरान | २०००० | | |
| ६ | टोमॅटो - चांगल्या प्रतिचे , मोठे | १२५०० | | |
| ७ | कोथंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १५०० | | |
| ८ | कोबी - चांगल्या प्रतिचा | ३०००० | | |
| ९ | भोपळा - चांगल्या प्रतिचा | ३२५०० | | |
| १० | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | २५००० | | |
| ११ | पालक - चांगल्या प्रतिचा | ४००० | | |
| १२ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| १३ | लिंबु -चांगल्या प्रतिचे | १०० | | |
| १४ | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | ६२५० | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | आद्रक -चांगल्या प्रतिचे, गावरान | ५०० | | |
| १६ | गाजर -चांगल्या प्रतिचे , गावरान | ७५ | | |
| १७ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | २५० | | |
| १८ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिच्या , गावरान | १२५ | | |
| १९ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | ७० | | |
| २० | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | ५० | | |
| २१ | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | १५० | | |
| २२ | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | ५० | | |
| २३ | बीट -चांगल्या प्रतिचे | ७ | | |
| २४ | फ्लावर -चांगल्या प्रतिची | १३०० | | |
| २५ | गवार शेंगा - गावरान | १० | | |
| २६ | दोडके - चांगल्या प्रतीचे | ३७५० | | |
| २७ | हिरवा वाटाणा | १००० | | |

| ऑक्टोबर - २०२४ ते डिसेंबर २०२४ करिता खरेदी करावयाचे भाजीपाला परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचे वर्णन | (मागणी किलो) | दर प्रती किलो | एकुण रक्कम |
| १ | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | ६७५०० | | |
| २ | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | ४५००० | | |
| ३ | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | ६७५० | | |
| ४ | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | ७५०० | | |
| ५ | वांगी -चांगल्या प्रतिचा, गावरान | २०००० | | |
| ६ | टोमॅटो - चांगल्या प्रतिचा, मोठा | १२५०० | | |
| ७ | कोथिंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १५०० | | |
| ८ | कोबी - चांगल्या प्रतिचा | ३०००० | | |
| ९ | भोपळा - चांगल्या प्रतिचा | ३२५०० | | |
| १० | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | २५००० | | |
| ११ | पालक - चांगल्या प्रतिचा | ४००० | | |
| १२ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| १३ | लिंबु -चांगल्या प्रतिचे | १०० | | |
| १४ | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | ६२५० | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | आद्रक -चांगल्या प्रतिचे, गावरान | ५०० | | |
| १६ | गाजर -चांगल्या प्रतिचे , गावरान | ७५ | | |
| १७ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | ५०० | | |
| १८ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिचा , गावरान | १२५ | | |
| १९ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | ९० | | |
| २० | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | ५० | | |
| २१ | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | १५० | | |
| २२ | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | ५० | | |
| २३ | बीट -चांगल्या प्रतिचे | ८ | | |
| २४ | फ्लावर -चांगल्या प्रतिची | १३०० | | |
| २५ | गवार शेंगा - गावरान | ४० | | |
| २६ | दोडके - चांगल्या प्रतीचे | ३७५० | | |
| २७ | हिरवा वाटाणा | १५०० | | |

| जानेवारी- २०२५ ते मार्च २०२५ करिता खरेदी करावयाचे भाजीपाला परिशिष्ट | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.नं. | मालाचे वर्णन | (मागणी किलो) | दर प्रती किलो | एकुण रक्कम |
| १ | बटाटा - इंदोर, चांगल्या प्रतिचा मोठा | ६७५०० | | |
| २ | कांदा - चांगल्या प्रतिचा, मोठा | ४५००० | | |
| ३ | लसुण - चांगल्या प्रतिचा , मोठा वाळलेला, गावरान | ६७५० | | |
| ४ | हिरवी मिरची - लवंगी (गावरान) | ७५०० | | |
| ५ | वांगी -चांगल्या प्रतिचे, गावरान | २०००० | | |
| ६ | टोमॅटो - चांगल्या प्रतिचे, मोठे | १२५०० | | |
| ७ | कोथंबीर -चांगल्या प्रतिची, गावरान | १५०० | | |
| ८ | कोबी - चांगल्या प्रतिचा | ३०००० | | |
| ९ | भोपळा - चांगल्या प्रतिचा | ३२५०० | | |
| १० | डांगर - चांगल्या प्रतिचे,मोठे | २५००० | | |
| ११ | पालक - चांगल्या प्रतिचा | ४००० | | |
| १२ | कढीपत्ता -चांगल्या प्रतिचा | १२५० | | |
| १३ | लिंबु -चांगल्या प्रतिचे | १०० | | |
| १४ | सिमला मिरची -चांगल्या प्रतिची | ६२५० | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | आद्रक -चांगल्या प्रतिचे, गावरान | ५०० | | |
| १६ | गाजर -चांगल्या प्रतिचे , गावरान | ७५ | | |
| १७ | आळुपाने -चांगल्या प्रतिचे , गावरान | १०० | | |
| १८ | शेवगा शेंगा-चांगल्या प्रतिच्या , गावरान | १२५ | | |
| १९ | मेथी भाजी -चांगल्या प्रतिची , गावरान | २० | | |
| २० | काकडी -चांगल्या प्रतिची , गावरान | ५० | | |
| २१ | भेंडी - चांगल्या प्रतिची , गावरान | १०० | | |
| २२ | रताळे -चांगल्या प्रतिचे , गावरान | ० | | |
| २३ | बीट -चांगल्या प्रतिचा | ५ | | |
| २४ | फ्लावर -चांगल्या प्रतिचा | १२०० | | |
| २५ | गवार शेंगा - गावरान | ० | | |
| २६ | दोडके - चांगल्या प्रतीचे | ३७५० | | |
| २७ | हिरवा वाटाणा | १५०० | | |

एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ अखेर भाजीपाला खरेदीसाठी तिमाही चार टप्प्यांसाठी BOQ वर स्वाक्षरी होणेस विनंती

Dhulwale
४/२

(तुकाराम हुलवळे)
प्र.मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी